<u>नियमित दिवाणी दावा क्र. ५७/२०१५ मधील निशाणी क्र.  ६०अ वरील आदेश</u>

१.  प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ३ यांनी नि.क्र. ५५, ५९ व ६० वरील आदेशाप्रमाणे झालेला खर्चाच्या आदेशाची पूर्तता करणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. ३ यांनी असे कथन केले आहे की, सदरचा खर्च नजरचुकीने भरणेचा राहून गेलेला आहे. प्रतिवादी क्र. ३ हा खर्च भरण्यास तयार आहे. तरी नि.क्र. ५५, ५९ व ६० वरील आदेशाप्रमाणे खर्च भरण्याची परवानगी मिळण्याची प्रतिवादी क्र. ३ यांनी विनंती केली आहे.

२.  वादीने सदर अर्जावर म्हणणे दाखल केले की,  सदर कामी नि. ५५ वरील आदेश दि. २१.०३.२०२२ रोजीचा आहे. तसेच नि. क्र. ५९ वरील आदेश दि. २.०९.२०२३ रोजीचा आहे. त्यानंतर  अनेक तारखा झाल्या आहेत. प्रतिवादीस योग्य संधी दिली आहे. प्रतिवादी हे त्यांचे जबाबदारीबाबत अत्यंत निष्काळजी आहे. तरी सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती केली आहे.

३.  दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला.

४.  अभिलेख पाहिला.  प्रतिवादींनी नि.क्र. ५५ चा अर्ज त्यांच्याविरुध्द पारित झालेला विना उलटतपासाचा आदेश रद्द करण्यासाठी दाखल केला होता. न्यायालयाने सदर अर्ज दि.२१.०३.२०२२ रोजी रक्कम रुपये एक हजारच्या खर्चावर मंजूर केला होता. परंतू प्रतिवादींनी सदरचा खर्च वेळेत भरलेला नाही. त्यानंतर प्रतिवादींनी दि. ०५.०८.२०२३ रोजी नि.क्र. ५९ वर सदर खर्च भरण्यासाठी अर्ज दाखल केला. सदर अर्जदेखील न्यायालयाने न्यायाच्या लाभात रक्कम रुपये दोनशेच्या खर्चावर मंजूर केला. सदर आदेशात न्यायालयाने आदेशाच्या पुढील तारखेपर्यंत प्रतिवादींनी खर्च भरावा म्हणून आदेशीत केले होते. परंतू, प्रतिवादींनी सदर आदेशाची देखील पूर्तता केलेली नाही. सबब न्यायालयाने नि.क्र. ५५ व ५९ वरील आदेश माघारी घेतले. त्यानंतर नि.क्र. ६० वर खर्च भरण्याचा परवानगीचा अर्ज दिलेला होता. सदरचा अर्ज दि. १६.०७.२०२४ रोजी मंजूर केलेला होता. सदर आदेशानंतर एक तारीख होवून गेल्यानंतर प्रतिवादी क्र. ३ यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.  सदरचे प्रकरण हे ९ वर्षापेक्षा जास्त जुने आहे. तसेच सदरचा दावा हा वादीने

खरेदीचा करार पूरा होवून खरेदीखत होवून मिळणेसाठी / विकल्पे करुन इसाराची रक्कम परत मिळणेसाठी दाखल केलेला आहे. सदर प्रकरणाचा रोजनामा पाहता, प्रतिवादी हे दाव्याचे कामी वारंवार गैरहजर असल्याचे दिसत आहे. तरीही प्रतिवादीस त्याची बाजू मांडण्यासाठी वारंवार संधी देण्यात आलेली आहे. प्रतिवादीचे वर्तणूकीवरुन असे दिसून येते की, सदरचे प्रकरण प्रलंबित ठेवण्याचा प्रयत्न करीत आहे. परंतू हे न्यायाचे गृहीत तत्व आहे की, प्रत्येकाला त्याची बाजू मांडण्याची संधी मिळावी. त्यामुळे नि.क्र. ५५, ५९ व ६० वरील आदेश मागे घेणे न्यायोचित ठरेल. मात्र प्रतिवादीच्या दिरंगाईमुळे वादीस शारिरीक, आर्थिक व मानसिक त्रास होणार आहे. त्यामुळे वादीस नुकसान भरपाई येणे योग्य ठरेल. वरील चर्चेच्या अनुषंगाने, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**१.** सदरचा अर्ज रक्कम रुपये पाचशेच्या खर्चासह मंजूर करण्यात येतो.

**२.** प्रतिवादी क्र. ३ यास निर्देशित करण्यात येते की, त्याने नि.क्र. ५५, ५९, ६० व प्रस्तुत अर्जातील खर्च रक्कम (१०००+ २०० + ३०००+ ५००= ४७००) वादीस पुढील तारखेपर्यंत द्यावी.

३. प्रतिवादीने नि.क्र. ५५, ५९, ६०, ६०अ वरील खर्च रक्कम भरल्यानंतर नि.क्र. ५९ वरील दि. १६.०७.२०२४ रोजीचा आदेश रद्द होईल.

४. दोन्ही पक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी, सदरचे प्रकरण जलदगतीने चालवावे.

SHRUTI NILESH GANGWAL SHAH
Digitally signed by SHRUTI NILESH GANGWAL SHAH
Date: 2024.11.25 13:26:29 +0530

(श्रीमती एस.एन. गंगवाल–शाह)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मंगळवेढा

दिनांक – २५/११/२०२४

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Order is same word to word, as per the original Order.

(a) Name of the Stenographer : P.T. Jadhav

(b) Name of the Court : C.J.J.D, Mangalwedha, Dist. Solapur,

(c) Order signed by P.O. on : 25.11.2024.

(d) Order uploaded on : 25.11.2024.